नियमीत दिवाणी दावा क्र.१५/२०२२
मनोहर वि. मानसी व ईतर

MHJN080001612022

## आदेश निशाणी क्र.२१ खाली
**(दि.०३/०३/२०२५)**

प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने दिवाणी प्रक्रिया संहिताची आज्ञा १ नियम १० अन्वये स्वता:ला प्रतिवादी म्हणुन समाविष्ट करण्यासाठी दाखल केला आहे. सोबत त्याने स्वता:चे शपथपत्र दाखल केले आहे.

०२. अर्जदाराने असे कथन केले की, दावामिळकत ही प्रतिवादी क्र.१ यांच्या नावे नाही. प्रतिवादी क्र.१ ने दि.०४/११/२०२२ रोजी नोंदणीकृत खरेदीखत क्र.३६४९/२०२२ आधारे अर्जदार यांना विक्री केलेली आहे. त्यानुसार वादग्रस्त मिळकतीवर अर्जदार हिचा कायदेशीर मालक म्हणुन ताबा आहे. सदरचे खरेदीखत सदर अर्जासोबत दाखल केलेले आहे. सदर खरेदीखतानुसार फेरफार क्र.१८५८ नुसार फेरफार ओढण्यात आला. अर्जदार यांचे कायादेशीर हक्क दाव्यामध्ये गुंतलेले असुन तिला दाव्यामध्ये प्रतिवादी क्र.३ म्हणुन प्रतिवादीच्या गोटात समाविष्ट करणे गरजेचे आहे. तसे न केल्यास अर्जदार हिस तिची कायदेशीर बाजु मांडण्यास अडचण होऊन तिचे हक्कापासुन तिला वंचीत व्हावे लागेल. अर्जदार हिला दाव्याध्ये समाविष्ट केल्यास वादीचे कुठलेही नुकसान होणार नाही. याउलट अर्जदारास दाव्यात समाविष्ट न करुन घेतल्यास तिचे आतोनात नुकसान होणार आहे व सदर वादमिळकतीवर तिचा असलेला कायदेशीर ताबा टिकवण्यास अनंत अडचणी निर्माण होणार आहे. त्याकरीता सदरचा अर्ज मंजुर करावा.

०३. मुळ दाव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादीने दावा हा मौजे हातडी, ता. घनसावंगी, जि. जालना येथील शेत जमीन गट क्र.१८८ क्षेत्र ६१ आर क्षेत्राचा ईसार पावती नुसार खरेदीखत करुन मिळावा व कायम मनाई हुकुम मिळावा म्हणुन

केलेला आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या वाटणीपत्राचे अवलोकन केले असता सदरचे खरेदीखत क्र.३६४९/२०२२ हे नोंदणीकृत असुन प्रतिवादी क्र.१ ने सदर अर्जदारास विकल्याचे दिसुन येते व सदर खरेदीखत नुसार अर्जदाराच्या नावाची नोंद ७/१२ उता-यावर आलेली आहे. सदर ७/१२ उतारा अभिलेखावर दाखल आहे. यावरुन स्पष्ट होते की, सदर दावामिळकतमध्ये अर्जदाराचा हितसंबंध गुंतलेला आहे. सदर दाव्याचे स्वरुप पाहता अर्जदारास सदर दाव्यास प्रतिवादी म्हणुन समाविष्ट करणे गरजेचे आहे. असे केल्यास सदर दावा गुणवत्तेवर चालविण्यास मदत होईल व एकापेक्षा जास्त प्रकरणे निर्माण होणार नाही. तसेच सदर दाव्याचे मुळ स्वरुप बदलणार नाही. सदर अर्जदारास प्रतिवादी म्हणुन समाविष्ट करुन वादी व प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. परंतु जर सदर अर्जदारास दाव्यात प्रतिवादी म्हणुन समाविष्ट न केल्यास अर्जदाराचे पैश्यांच्या स्वरुपात न भरुन येणारे नुकसान होण्याची शक्यता आहे. अशास्थितीत अर्जदार हा दाव्यामध्ये आवश्यक पक्षकार आहे. सदरचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. म्हणुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

०१) अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

०२) वादीने अर्जदारास दाव्यामध्ये प्रतिवादी क्र.३ म्हणुन समाविष्ट करावे.

०३) वादीने अर्जदारास दाव्यामध्ये प्रतिवादी क्र.३ म्हणुन समाविष्ट केल्यानंतर लेखी कैफीयत दाखल करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

०४) वादीने सदर दाव्यात सदर आदेशानुसार दुरुस्ती करण्यात यावी.

०५) उभय पक्षकारांनी नोंद घ्यावी.

स्वाक्षरीत/-
**(श्रीमती एल. एन. पांचाळ)**
सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर),
घनसावंगी.

दिनांक ०३/०३/२०२५